p./desktop/Circular

# University of Mumbai

संलग्नता विभाग

ताबडतोब/तात्काळ /हस्ते बटवडा

क्र. संलग्नता/आयसीसी/२०१६-१७/ २९

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये,

विषय:- महाविद्यालयाचे संलग्नीकरण व अध्यापकांची मान्यता या प्रक्रियेंचे संगणकीकरण करणेबाबत.
संदर्भ:- क्र. १. संलग्नता/आयसीसी/२०१६-१७/२३, दिनांक ३० डिसेंबर, २०१६
२. संलग्नता/आयसीसी/२०१६-१७/२७, दिनांक २५ जानेवारी, २०१७

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषया संदर्भात मा. कुलगुरू महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सर्व संलग्नीत महाविद्यालयांच्या/ संस्थांच्या माहितीचे संगणकीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे.

तद् अनुषंगाने बहुतांश महाविद्यालयांनी/ संस्थांनी या प्रणालीचे लॉगीन आयडी (Login Id) प्राप्त केले आहेत. याबाबत विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व संलग्नीत महाविद्यालये/ संस्थांना संदर्भीय परिपत्रकाद्वारे वारंवार सुचित करण्यात आले होते व सर्व संलग्नित महाविद्यालयांनी/ संस्थांनी आपल्या महाविद्यालयाची माहिती व सलग संलग्नतेच्या प्रस्तावाची माहिती दिनांक ०४/०२/२०१७ व दिनांक ०८/०२/२०१७ रोजी पर्यंत ऑनलाईन सादर करावी असे सुचित करण्यात आले होती, परंतु काही सलग संलग्नीकरण प्राप्त, कायम संलग्नीकरण प्राप्त, शैक्षणिक स्वायत्ता प्राप्त इ. महाविद्यालयांनी त्यांचे महाविद्यालये/ संस्थेकरिताचे लॉगीन आयडी (Login Id) आद्याप पर्यंत प्राप्त केले नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. अशा महाविद्यालयांना दिनांक १३/०२/२०१७ ते १८/०२/२०१७ पर्यंत आपले महाविद्यालय/ संस्थे करिताचे लॉगीन आयडी (Login Id) विद्यापीठाच्या https://muonline.org.in या संकेतस्थळाला भेट देऊन प्राप्त करून घ्यावेत. दिनांक १८/०२/२०१७ रोजी नंतर लॉगीन आयडी (Login Id) प्राप्त करण्यासाठी आलेल्या महाविद्यालयांना विलंबशुल्काशिवाय लॉगीन आयडी प्राप्त करता येणार नाही.

संलग्नीत महाविद्यालयांनी/ संस्थानी आपल्या महाविद्यालयाची माहिती तथा सलग संलग्नतेचा प्रस्ताव शेवट दिनांक २२/०२/२०१७ पर्यंत ऑनलाईन सादर करणे अनिवार्य आहे कारण महाविद्यालयांना विविध समित्या देणे, समित्यांमार्फत अहवाल प्राप्त करणे, विविध मान्यता पत्र पाठविणे इ. सर्व कामे पुढील काळात ऑनलाईन केली जाणार आहेत.

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव

मुंबई - ४०० ०३२.
10th फेब्रुवारी, २०१७